Page No.:
Date:
YOUVA

# कवितेचा जन्म

कवितेचा जन्म नसतो ओठातून ।
ती येते पोटातुन ॥
पोटातुन येतांना, सोबत असते माया ।
त्यावर असते प्रेमाची छाया ॥
वाटेत भेटते हृदय ।
कनवाळू अन सहृदय ॥
कवितेला देते दया आणि करुणा ।
तिच्यात येते सह संवेदना ॥
सरस्वतीचा मिळतो वरदहस्त ।
कवितेचे वाढते रूप मस्त ॥
पुढे कंठातुन मिळते तिला माधुर्य ।
खुलुन येते तिचे सौंदर्य ॥
पहारेकरी असतात बत्तीस दात ।
कठोरतेवर करतात आघात ॥
मृदु मुलायम जिभेचे पोत ।
कोमलतेने ओतप्रोत ॥
मग ओठाच्या मार्गाने बाहेर येते ।
सर्वांग सुंदर कविता होते ॥

प्रेम जिव्हाळा सह संवेदना ।
कवितेचे खरे अवयव जाणा ॥
या विण कविता पूर्ण होत नाही ।
तिला कविता कोणी म्हणत नाही ॥



शोभा पांडे
गुरुगणेश नगर कोथरुड पुणे
9405438939



श्री. प्रकाश देशपांडे